महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महावितरण
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/अ/ No - 3317 दिनांक : 01 FEB 2010

## परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनाबाबत.

..........

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन देण्याबाबत सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी विविध परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात आले होते. क्षेत्रीय कार्यालयामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये विविध ठिकाणी वेगवेगळ्या बाबी (Loading) चा समावेश केल्यामुळे किमान वेतन देण्यामध्ये समानता दिसून येत नाही. कंत्राटी कामगारांना शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन देण्यात येते किंवा नाही हे पाहण्याची दक्षता क्षेत्रीय कार्यालयाकडून घेतली जात नाही, असेही निदर्शनास आले आहे, जे की, कायद्यानुसार बंधनकारक आहे.

शासनाचे अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दि. १८ ऑगस्ट २००४ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र -१ ल मध्ये प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | कामगारांची वर्गवारी | मूळ किमान वेतनदर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | * परिमंडळ - १ | * परिमंडळ - २ | * परिमंडळ - ३ |
| (१) | (२) | (३) | | |
| १. | कुशल | ३३३०.०० | ३२३०.०० | २९३०.०० |
| २. | अर्धकुशल | ३२३०.०० | ३१३०.०० | २८३०.०० |
| ३. | अकुशल | ३१३०.०० | ३०३०.०० | २७३०.०० |

* स्पष्टीकरण - महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ

(अ) परिमंडळ-१ — महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्रांचे मिळून होईल.

(ब) परिमंडळ-२ — महाराष्ट्र राज्यातील 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्रांचे मिळून होईल.

(क) परिमंडळ-३ — परिमंडळ १ व २ वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम - १९४८ मुंबई यांनी दि. ०४/०८/२००९ च्या आदेशान्वये दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि.०१/०७/२००९ ते ३१/१२/२००९ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | ९५५.३० | ९५५.३० | ९५५.३० |

* विशेष भत्ता दराची (६ महिन्यांकरिता) अंमलबजावणी कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकाप्रमाणे करावयाची आहे. विशेष भत्ता दराचे परिपत्रक मा. कामगार आयुक्त, ताडदेव, मुंबई यांच्याकडून निर्गमित झाल्यानंतर त्यास सांघिक कार्यालयाकडून परिपत्रकाद्वारे माहे जाने.२०१० पासून पुढील कालावधीसाठी प्रसिध्दी देण्यात येईल. (सहा महिन्यांकरिता कालावधी म्हणजे "१ जानेवारी ते ३० जून" आणि "१ जुलै ते ३१ डिसेंबर" असा राहील.)
* रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारास देय असलेले मजुरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्यावर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दराना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करुन काढण्यात येईल.
* किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल.
* शासनाकडून ज्यावेळी किमान वेतनाच्या दरात बदल होईल त्यावेळी किमान वेतन दरात वेळोवेळी सुधारणा केली जाईल.

कंत्राटी कामगारांच्या निविदेतील लोडिंग मध्ये सुसूत्रता व समानता राहील याकरिता कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत अंदाजपत्रक तयार करताना त्यामध्ये खालील बाबींचा / लोडिंगचा (Loading) समावेश असावा.

| | | |
|---|---|---|
| १) भविष्य निर्वाह निधीचा ठेकेदाराचा वाटा | - | १२% |
| २) भविष्य निर्वाह निधीच्या प्रशासकीय खर्चासाठी | - | १.६१% |
| ३) बोनस | - | ८.३३% |
| ४) घरभाडे भत्ता (महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ व १९९०) (ज्या कंत्राटी कामगारांने एक महिन्यापेक्षा कमी काम केले त्यांना प्रोरेटा पध्दतीने घरभाडे भत्ता देण्यात यावा.) | - | ५% |
| ५) कामगार राज्य विमा योजना योगदान (ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू आहे तेथे) | - | ४.७५% |
| ६) विमा व कामगार नुकसान भरपाईकरिता खर्च (ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू नाही तेथे) | - | १% |
| ७) रजा रोखीकरण (Paid leave contribution) (२० दिवसांच्या कामा मागे एक दिवसाच्या रजेचा पगार) | - | ४% |
| ८) सुरक्षिततेच्या साधनसामुग्रीकरिता | - | १% |
| ९) ठेकेदाराचे दर / नफा / आयकर इत्यादी | - | ५% |
| | | ४२.६९% |

ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू आहे त्या ठिकाणी एकूण लोडीग ४३% (पूर्णांकात)
ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू नाही त्या ठिकाणी एकूण लोडीग ३८% (पूर्णांकात)

वरीलप्रमाणे किमान वेतनाचे दर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन कायद्यान्वये अदा करणे बंधनकारक आहे. यायाबत क्षेत्रीय कार्यालयातील कामगार औद्योगिक संबंध विभागातील अधिकाऱ्यांकडून कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन कायद्यान्वये वेतन दिले जात असल्याचे प्रमाणित करुन घेतल्यानंतरच कंत्राटदाराची देयके अदा करण्यात यावीत. तरी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी.

राहुल गोवर्धन

कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रत : प्रेषण यादी प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc